श्री लंका व पाकिस्तान

चन्द्रशेखर पुरन्दरे

लोकशाहीच्या मर्यादा पुढील घटनांवरून कळाव्यात.

श्री लंका

श्री लंकेत २०१५ला अध्यक्षीय निवडणूक झाली. आपण परत निवडून येऊ हा तेव्हाचे अध्यक्ष महिन्द राजपक्ष यांचा अंदाज चुकला आणि ते हरले. त्यांच्याच सरकारमध्ये आधी मंत्री असणारे मैत्रीपाल सिरीसेना अध्यक्ष झाले, तर राणील विक्रमसिंघे पंतप्रधान.

मात्र राजपक्ष यांच्या पडद्यामागच्या कारवाया चालू राहिल्या. त्यांचा परिणाम म्हणजे या २६ ऑक्टोबरला सिरीसेना यांनी विक्रमसिंघे यांना पंतप्रधानपदावरून हटवले आणि राजपक्ष नवीन पंतप्रधान झाले. या सगळ्या कटाबाबत संसद अंधारात होती व देशही. पंतप्रधान संसद ठरवते, अध्यक्ष नाही. सिरीसेना यांनी हा संकेत झुगारला. तर विक्रमसिंघे यांनी पद सोडण्यास नकार दिला. म्हणजे एकाच वेळी देशात दोन पंतप्रधान निर्माण झाले.

मग बहुसंख्य सांसदांनी विक्रमसिंघे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आणि अध्यक्षाचे कृत्य घटनाविरोधी असल्याचे जाहीर केले. सांसद फोडण्यासाठी लाच देण्याचा प्रयत्नही राजपक्षेंकडून झाला. मग सिरीसेनाने संसदच बरखास्त केली आणि नवीन निवडणुका जाहीर केल्या. प्रकरण कोर्टात गेले. कोर्टाने संसद बरखास्त करण्याचा निर्णय अवैध ठरवला आणि निवडणुका स्थगित केल्या.

थोडक्यात, लेख लिहिण्याच्यावेळी देशाला वैध पंतप्रधानही नाही आणि सरकारही नाही.

याची पार्श्वभूमी पाहू.

राजपक्ष यांच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत तीन प्रमुख प्रकरणे. एक - तमिळ एलमचा शेवट. त्यात हजारात निरपराध तमिळ ठार मारले गेले. त्याबाबत गंभीर आंतरराष्ट्रीय आक्षेप अजून आहेत. दोन - राजपक्ष यांच्या कुटुंबीयांनी प्रचंड पैसा केला. तीन - चीनचा देशात मोठा शिरकाव. सिरीसेना-विक्रमसिंघे या आघाडीने सत्तेवर आल्यास ही गैरकृत्ये उघडकीला आणू, चीनशी जवळीक थांबवू अशी आश्वासने दिली होती. (भारताच्या ढवळाढवळीने राजपक्ष यांचा पराभव झाला व ही आघाडी सत्तेवर आली असा एक दावा आहे.)

पण चीनपासून विभक्त होणे सोपे नाही हे या आघाडीच्या लवकरच लक्षात आले. राजपक्ष यांच्या विरोधात असणारी पश्चिम किंवा भारत यांच्याकडे श्रीलंकेला मदत करण्याची क्षमता चीनच्या तुलनेत नगण्य आहे. राजपक्ष परत सत्तेवर येणे चीनलाही सोयीचे. त्यासाठी सिरीसेनांना 'हवा तो प्रकल्प करावा' यासाठी चीनने सुमारे ३० कोटी डॉलर्सचे अनुदानही दिले.

मात्र सत्तांतर सुरळित झाले नाही व लोकशाहीच धोक्यात आली. राजपक्षविरोधी मतदारांना ही फसवणूक वाटते. आंतरराष्ट्रीय स्तरावर श्रीलंकेत लोकशाही टिकते का नाही याविषयी संयुक्त राष्ट्रसंघापासून अनेकांनी चिंता व्यक्त केली आहे. देशांतर्गत वातावरण अस्वस्थ आहे.

पाकिस्तान

पाकिस्तानातील असहिष्णु धर्ममार्तंडांचा उदय हा त्या देशाबरोबरच इतर जगालाही चिंतेचा विषय आहे,

दहा वर्षांपूर्वी पाकिस्तानातील पंजाब प्रांतात आशिया बीबी या एका शेत-मजूर स्त्रीला 'प्रेषिताचा अपमान' केला या आरोपावर अटक झाली व खटला भरण्यात आला. पाकिस्तानात आज 'प्रेषिताचा अपमान' या गुन्ह्याला मृत्यदंड आहे. हा अजब कायदा १९८६ ला अस्तित्वात आला. त्या अन्वये

आज कोणीही उठून दुसऱ्यावर तसा आरोप करू शकतो. यात वैयक्तिक दुष्मनीला वाव रहातो. सरकारने जरी आजवर या कायद्याखाली कोणाला फाशी दिली नसली, तरी माथेफिरू या हत्या सर्रास करतात. (१९८६ पासून ६० ते ९० अशा खाजगी हत्या.) १९२७ ते १९८६ पर्यंत असे आरोप सुमारे डझनभर असतील, १९८६ नंतर ४ हजारावर. प्रामुख्याने अ-मुस्लिमांवर. ते पाकिस्तानात ३ टक्के असले तरी या प्रकरणात ५० टक्केहून अधिक आरोपी असतात.

आशिया बीबीने नक्की काय गुन्हा केला हे अजून स्पष्ट नाही. ती धर्माने ख्रिश्चन. मुस्लिम-अंतर्गत इतर पंथीयांना (शिया, अहमदिया) व इतर धर्मियांना सुन्नी मुख्य प्रवाह अस्पृश्यासारखे वागवतो.

एक दिवस आशिया बीबी शेतावर काम करणाऱ्या इतर मुस्लिम स्त्री-मजुरांसाठी पाणी घेऊन आली. त्याच भांड्याने स्वत:ही पाणी प्याली. हे घटनेचे एक वर्णन. ती अस्पृश्य असल्याने हा गुन्हा झाला. मग तिला मुस्लिम होण्यास सांगण्यात आले. त्याला तिने नकार दिला. हा दुसरा गुन्हा. मग तिच्यावर 'प्रेषिताचा अपमान' हा आरोप करण्यात आला. यात मेख अशी आहे, की नक्की काय अपमान केला हे तोंडी जरी सांगितले तरी तो दुसरा अपमान होतो. ते लिहिणे हा तिसरा अपमान! म्हणजे तिची बाजू कळणेच अशक्य.

मग तिला पहिल्या कोर्टाने फाशीची शिक्षा दिली, त्यावरच्या कोर्टाने ती शिक्षा कायम केली. कडव्या इस्लामी 'श्रद्धावंतांच्या' भीतीने त्यांना अनुकूल निर्णय दिले जातात. खटला सुप्रीम कोर्टापर्यंत गेला. ही आठ-नऊ वर्षे या पाच मुलांच्या आईला एकटीला कोठडीत ठेवण्यात आले होते, या ऑक्टोबरमध्ये सुप्रीम कोर्टाने तिला निर्दोष मुक्त केले.

हा निर्णय ज्या दिवशी सकाळी जाहीर झाला, त्याच संध्याकाळी देशभर या निर्णयाविरुद्ध हजारोंच्या संख्येने लोक रस्त्यावर आले व तिला सार्वजनिक फाशी देण्याची मागणी करू लागले. त्यांनी इस्लामाबाद, फैजाबाद, कराची, लाहोर इत्यादी शहरांत जाळपोळी, पोलिसांवर दगडफेक करणे, हायवे बंद करणे सुरु केले. त्यापुढे जाऊन त्यांनी हा निर्णय देणाऱ्या न्यायाधीशांना ठार मारावे अशी मागणी केली. लष्करप्रमुख अहमदिया आहे म्हणून लष्कराने बंड करावे, इम्रान खानला हाकलून द्या अशी भाषा सुरु झाली.

मागच्या वर्षी खासदारांच्या शपथविधीतील एक शब्द सरकारने बदलला म्हणून इस्लामचा अपमान झाला या संतापाने असेच 'धार्मिक' रस्त्यावर आले होते आणि त्यांनी देश ठप्प केला होता. सरकारला यात माघार घ्यायला लागली, तीही लष्कराच्या हस्तक्षेपानंतर. तेव्हा लष्कराने विरोधकांना रोख रकमा दिल्या होत्या. ही लष्कराची या शक्तींबाबत जवळीक. इम्रान खाननेही त्याच्या निवडणूक प्रचारादरम्यान या लोकांचे लांगूलचालन केलेले आहे.

आशिया बीबी प्रकरणाला व्यापक सामाजिक-राजकीय इतिहासही आहे. ती तुरुंगात एकाकी खितपत होती तेव्हा २०११ साली पंजाब प्रांताचा तेव्हाचा गव्हर्नर सलमान तसीर तिला भेटायला तुरुंगात गेला होता आणि हा कायदा बदलला पाहिजे असे म्हणाला. त्यास्तव त्याच्याच एका 'धार्मिक' अंगरक्षकाने त्याचा गोळ्या घालून खून केला आणि तो हसत, उन्मादात पोलिसांच्या हवाली झाला. पुढे त्याला फाशी झाली. तेव्हाही श्रद्धावंत लाखोंनी त्याच्या समर्थनार्थ रस्त्यावर आले. आता तो हुतात्मा मानला जातो. त्याचे स्मारक हे तीर्थस्थान आहे. त्याच्यापासून स्फूर्ती घेऊन एक राजकीय पक्षही उगवला. 'आशिया बीबीला फाशी द्या' या मागणीत तो पक्ष अग्रेसर आहे. त्यामुळे सुटकेच्या निर्णयानंतरही काही दिवस तिला तुरुंगातच ठेवण्यात आले. नंतर एका अज्ञात सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. तिच्या नवऱ्याने तिला आश्रय द्यावा म्हणून ब्रिटनला अर्ज केला आहे.

आता तरी सरकार व 'श्रद्धावंत' यांच्यात समेट झाला आहे आणि आंदोलन थांबले आहे. त्यासाठी आशियाला देश सोडता येऊ नये ही विरोधकांची मागणी सरकारने मान्य केली. तसेच कायदामंत्र्याला राजीनामा द्यायला लागला. म्हणजे कोणताही गुन्हा न करता, एका लोकशाहीत तिच्यावरची मृत्यूची तलवार कायम टांगती आहे.

तात्पर्य, श्री लंकेत अंतर्गत भ्रष्टाचार व बाहेरून चीनचा आर्थिक साम्राज्यवाद हे लोकशाही दुबळी करतात तर पाकिस्तानात विकृत धर्मश्रद्धा लोकशाही खिळखिळी करते.

www.art-non-deco-com

artnondeco@yahoo.co.uk